# प्रेसनोट ता.०२/१२/२०१९

महाराष्ट्र पोलीस स्थापना दिना निमित्त पुणे ग्रामीण जिल्हा पोलीस दलाने जिल्हा पातळीवर मा. पोलीस अधिक्षक श्री.संदीप पाटील यांचे मार्गदर्शना खाली श्रीमती ऐश्वर्या शर्मा (भापोसे)व श्रीमती डॉ.सई भोरे–पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी हवेली विभाग व पोलीस निरीक्षक श्री.बोबडे पोलीस कल्याण विभाग यांचे नियोजनात पोलीस रिसर्च सेंटर पाषाण येथे **महीलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी कडक कायदे करणेपेक्षा सामाजीक बदलाची गरज आहे**.या विषयावर जिल्हास्तरीय वादविवाद स्पर्धा घेण्यात आल्या. सदर स्पर्धेमध्ये पुणे ग्रामीण जिल्हयातील **हवेली विभागातुन** करूणा सोनूने,आयना श्रीवास्तव(जे.एस.पी.एम.कॉलेज वाघोली)यश मेमाणे,वैंभवी काळभोर(पृथ्वीराज कपूर मेमोरीयल कनिष्ठ महाविदयालय लोणीकाळभोर)**बारामती विभागातून** श्रेया जगदाळे,धनश्री पवार(शारदाबाई पवार महावियालय शारदानगर माळेगाव) **भोर विभागातुन** रोशन इंदलकर(पुरंदर हायस्कूल.सासवड)ज्ञानेश्वरी कोलते (डॉ.शंकरराव कोलते विदयालय) **दौंड विभागातुन** श्रुती जमादार(ग्लोरी सायन्स कॉलेज)उमेर खान (ग्लोरी सायन्स कॉलेज)ईश्वरी खैंरे,निलेश माळी(विदयाधाम प्रशाला शिक्रापुर) **जुन्नर विभागातुन** इशान मुजावर(ज्ञानदीप ज्युनिअर कॉलेज)साक्षी मुळे,केतकी सोमन,सायली राउत,गौंरी थोरात(सबनीस विदयालय नारायणगाव) **लोणावळा विभागातून** संजना पिलाने,काजल भोईरकर **खेड विभागातुन** तन्वी देशमुख,सुकंती सोमवंशी (जनता विदयालय घोडेगाव) असे ११ संघ निवडले होते.कार्यक्रमाची प्रस्तावना श्रीमती डॉ.सई भोरे–पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी हवेली विभाग यांनी केली. स्पर्धेचे परीक्षक म्हणून १)श्री.शरद पाबळे पत्रकार सकाळ २)डॉ.जयश्री पलांडे अध्यक्ष कस्तुरी शिक्षण संस्था पुणे ३) श्रीमती.वैंशाली रानडे महीला बाल कल्याण समिती,पुणे यांनी काम पाहीले.स्पर्धेतून प्रथम क्रमांक १) निलेश सुरेश माळी विदयाधाम प्रशाला शिक्रापुर (दौंड विभाग)२) ईश्वरी सुभाष खैंरे विदयाधाम प्रशाला शिक्रापुर (दौंड विभाग) व्दितीय क्रमांक १) वैंभवी काळभोर पृथ्वीराज कपुर मेमोरियल कनिष्ठ महाविदयालय लोणीकाळभोर (हवेलीविभाग) यांचा येवून त्यांची कोल्हापुर परीक्षेत्र पोलीस विभाग स्तरावर होणारे वादविवाद स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.विजेत्या स्पर्धकांना पुढील होणारे स्पर्धेसाठी मा.पोलीस अधिक्षक श्री.संदीप पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.या वादविवाद स्पर्धेसाठी पोलीस अधिक्षक कार्यालय पुणे ग्रामीण येथील पोलीस अधिकारी,पोलीस कर्मचारी तसेच विविध विदयालयातील विदयार्थी हजर होते.स्पर्धेसाठी आलेल्या सर्व स्पर्धकांचे तसेच परीक्षकांचे तसेच आलेल्या मान्यवरांचे श्रीमती ऐश्वर्या शर्मा (भापोसे) यांनी आभार मानले. स्पर्धेचे सुत्रसंचालन प्रणाली शिवाजी हरपळे एस.एन.डी.टी.कॉलेज कोथरूड यांनी केले.